# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 341/2023 दिनांक : 04.09.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**किनवट** :–दिनांक 03.09.2023 रोजी चे 10.00 वा. चे सुमारास, **सरपंच यांच्या घरी शनिवार पेठ ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद अकरा आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन पोलीस स्टेशनला केस करण्याच्या कारणावरून गावातील सरपंच यांच्या घरी बैठक बसली असतांना यातील आरोपीतांनी फिर्यादी व फिर्यादीचे दोन भाऊ व भावाचा मुलगा यांना कुऱ्हाडीने व काठयाने मारहाण करून गंभीर जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी अर्जुन रमेश राठोड, वय 22 वर्षे, व्यवसाय शेती रा. शनिवार पेठ ता. किनवट जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन **215/2023 कलम** 307, 326, 324, 323, 109, 143, 147, 148, 149, 506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सावंत, मो. नं. 9923612402** हे करीत आहेत.

## 2)ट्रॅक्टर चोरी :–

**देगलुर** :– दिनांक 27.08.2023 रोजी चे 21.30 ते दि. 28.08.2023 चे 08.00 वा. चे दरम्यान, **मौ. मेदनकल्लुर गावातुन ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे जॉन्डीअर कंपणीचे ट्रॅक्टर क्रमांक केए–39/टी–3066 किंमती 4,00,000/–रूपयाचे मेदनकल्लुर गावात लावले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी शेख फेरोज शेख इमामसाब, वय 37 वर्षे, व्यवसाय शेती रा. मेदनकल्लुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 401/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मोरे, मो. क्रं. 9764574333** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**1)ईस्लापुर** :– दिनांक 01.04.2021 रोजी चे 01.00 वा. चे सुमारास, **मौ. इरेगाव फिर्यादीच्या सासरी ह. मु. सावरगाव ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुला मुलबाळ होत नाही, तु वांझोटी आहेस, तु पांढऱ्या पायाची आहेस. तु आमच्या घरात राहु नकोस, मला मो सा घेण्यासाठी दीड लाख रूपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करून तीचा शारिरीक व माणसीक छळ केला व घरा बाहेर हाकलुन दिले. वगैरे **फिर्यादी** 23 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे ईस्लापुर** गुरनं 88/2023 कलम 498(अ), 323, 504, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास श्रेणी पोउपनि/आर जी कांबळे, मो.क्रं. 7559338661** हे करीत आहेत.

## 4)बसचे काचा फोडुन नुकसान :–

**उस्माननगर** :–दिनांक 02.09.2023 रोजी चे 20.00 वा. चे सुमारास, **हळदा ते काटकळंबा दरम्यान हळदा तांडा बसस्टॉप हळदा ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्यांची बस क्रमांक एमएच–40/एन–9858 ही घेवुन नांदेड ते टेंम्बुर्णीकडे जात असतांना यातील अज्ञात आरोपीतांनी वय अंदाजे 30 ते 35 वर्षाच्या आतील तोंडाला दस्त्या बांधुन अचानक बसच्या समोर येऊन बस अडवुन जय भवानी जय शिवाजी अशा घोषणा देऊन बसच्या समोरील व बाजुचे हेडलाईट वर दगड मारून बसच्या काचा फोडुन 30 ते 35 हजार रूपयाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी दत्ता पि. गोविंदराव वडवळे, वय 51 वर्षे, व्यवसाय एसटी चालक रा. कापसी बु ता. लोहा. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरन 129/2023 कलम 341, 336, 427, 34, भादवि सह कलम 3 सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2227 महाबळे, मो. नं. 7776992227** हे करीत आहेत.

## 5)खंडणी :–

**कुंडलवाडी** :–दिनांक 03.09.2023 रोजी चे 06.30 वा. चे सुमारास, **साईराज हॉटेल तंदुरी ढाबा कोंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी साईराज हॉटेल तंदुरी ढाबा कोंडलवाडी येथे मॅनेजर म्हणुन डयुटी करीत असतांना यातील नमुद आरोपी हा ढाब्यात येवुन मॅनेजरला धमकावुन बळजबरीने 5550/–रूपयाची विदेशी दारूचा मुद्येमाल घेवुन मो सा वर निघुन गेला. वगैरे **फिर्यादी वैभव चांदराव जाधव, वय 30 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी मॅनेजर रा. सिध्दार्थनगर बिलोली ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरनं 107/2023 कलम 384 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2821 चव्हाण, मो.क्र. 9823017330** हे करीत आहेत.

## 6)पळवुन नेले :–

**तामसा :–** दिनांक 02.09.2023 रोजी चे 11.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घरातुन शिवाजीनगर तामसा ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **मुलगा नामे कार्तिकेश, वय 07 वर्षे, रा. तामसा ता. हदगांव जि. नांदेड** यास यातील आरोपी काका याने घराबाहेर बोलावुन फिरायला घेवुन जातो म्हणुन घेवुन गेला त्यानंतर त्याचे आरोपी काकाने दिनांक 03.09.2023 रोजी सकाळी 07.30 वा. चे सुमारास फोन करून फिर्यादीस म्हणाला की माझे फोन पे वर दोन लाख रूपये पाठव नाहीतर तुला तुझा मुलगा दिसु देणार नाही अशा प्रकारची धमकी देवुन फोट केला. सदर गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याने सपोनि श्री मुंजाजी दळवी, यांनी स्टॉपसह गुन्हयाचा तपास करून सायबर शाखेचया मदतीने रेल्वेस्टेशन नांदेड, धर्माबाद, व बासर येथे जावुन तपास करीत असतांना बासर रेल्वेस्टेशनवर आरोपी पिडीत मुलास घेवुन जाण्याच्या तयारीत असताना पकडुन सात तासाचे आत आरोपी व पिडीत मुलास ताब्यात घेतले आहे. वगैरे **फिर्यादी सौ. गितांजली शंकर कडभाने, वय 29 वर्षे व्यवसाय घरकाम रा. मध्यवर्ती बँकेसमोर शिवाजीनगर तामसा ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 83/2023 कलम 363, 364(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री मुंजाजी दळवी, मो.क्र. 7744827771** हे करीत आहेत.

## 7)प्राणी संरक्षण अधिनियम :–

**तामसा :–**दिनांक 03.09.2023 रोजी चे 10.00 वा. चे सुमारास, **वडगाव बु. येथील छत्रपती चौक तामसा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या एकुण पाच जर्शी जातीचे गाय व गोरे दाटी वाटी क्रुरपणे बांधुन वाहन क्रमांक एमएच–26/बीई–7033 एकुण किंमती 9,16,000/–रूपयाचे मुद्येमलासह कतलीसाठी वाहतुक करीत अतसांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2498, पंडीत केशवराव कल्याणकर, ने. पोस्टे तामसा** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे तामसा गुरन 84/2023** कलम 5(अ), 9 प्राणी संरक्षण अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/श्री गायकवाड, मो. नं. 9322995681** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**कुंटूर :–** दिनांक 03.09.2023 रोजी चे 17.30 वा. चे सुमारास, **मौ. बरबडा ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीतया गोलाकार बसुन तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य 2550/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1198 मोहन सुरेश कंधारे, ने. पोस्टे कुंटूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 156/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2315 सोनकांबळे, मो.क्रं. 9049117415** हे करीत आहेत.

## 9)गळफास घेवुन आत्महत्या :–

**उस्माननगर :–**दिनांक 30.08.2023 रोजी चे सायंकाळी 17.30 पुर्वी, **मौ. काठकळंबा ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे गोविंद निवृत्ती कस्तुरे, वय 44 वर्षे, व्यवसाय शेती रा. काटकळंबा ता. कंधार जि. नांदेड** , यानी शेतातील सततचे नापीकीस व बँकेचे कर्ज कसे फेडावे या तणावातुन पत्राच्या खाली दांडीला साडीने गळफास घेवुन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार सुनिता भ्र. गोविंद कस्तुरे, ववयच 40 वर्षे, व्यवसाय घरकाम व शेती रा. काटकळंबा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे उस्माननगर** आ. मृ. **37**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री पल्लेवाड, मो.नं. 7350756405** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड